**ठळक बातम्या**

- व्यक्तीचा स्वाभिमान आणि संरक्षणासाठी शिक्षण अत्यावश्यक असून, संवेदनशील शिक्षक या भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवतात, असं राष्ट्रपतींचं प्रतिपादन, राज्यातले ६ शिक्षक राष्ट्रीय पुरस्कारानं सन्मानित

- नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यात सुमारे साडेचौदा लाख हेक्टर क्षेत्रावरच्या पिकांना फटका /पंचनाम्याचं काम अंतिम टप्प्यात, शेतकऱ्यांना योग्य ती मदत तातडीनं दिली जाईल अशी कृषीमंत्र्यांची ग्वाही

- मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांचा शपथविधी

**आणि**

- उद्याच्या गणेशविसर्जनासाठी प्रशासन सज्ज / ईद ए मिलाद निमित्त राज्यात विविध कार्यक्रम

**<><><><><>**

अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांप्रमाणेच, शिक्षण हे व्यक्तीचा स्वाभिमान आणि संरक्षणासाठी अत्यावश्यक असून, संवेदनशील शिक्षक, या भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवतात, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. शिक्षक दिनाच्या निमित्तानं, नवी दिल्लीतल्या विज्ञान भवनात झालेल्या राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यात त्या बोलत होत्या. मुलींच्या शिक्षणातली गुंतवणूक ही कुटुंब, समाज आणि देशाच्या उभारणीत अनन्यसाधारण भूमिका बजावते, असं प्रतिपादन त्यांनी केलं. आधुनिक भारताच्या उभारणीत सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करताना त्या म्हणाल्या,

***होल्ड... बाईट- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू (१३ सेकंद)***

यावेळी राष्ट्रपतींनी देशातल्या ६६ शिक्षकांना उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कार प्रदान केले. त्यात राज्यातल्या ६ शिक्षकांचा समावेश आहे. यातील, नांदेड जिल्ह्यातल्या अर्धापूर जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक आणि विज्ञान विषयाचे शिक्षक डाॅ.शेख मोहम्मद वकीउद्दीन शेख हमीदउद्दीन यांनी विविध उपक्रमांच्या माध्यमातून, शाळेला शिक्षणासोबतच सामाजिक सुधारणांचं केंद्र बनवण्याचं काम केलं आहे. तर लातूरच्या दयानंद कला महाविद्यालयाचे संगीत विषयाचे प्राध्यापक डॉ. सांदिपान जगदाळे यांनी अध्यापनाला शास्त्रीय ज्ञानासोबतच, नाविन्यपूर्ण प्रयोगांची जोड दिली. ब्रेल लिपीत संगीत अभ्यासक्रमाची पुस्तकं, QR कोडवर आधारित अभ्यास साहित्य विकसित केलं, मुंबईतल्या अणुउर्जा केंद्रीय विद्यालयातल्या सोनिया कपूर यांनाही राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार मिळाला आहे.

उच्च आणि तंत्रशिक्षण संस्थांमधे बारामतीचे पुरुषोत्तम पवार आणि मुंबईच्या डाॅ. नीलाक्षी सुभाष जैन, तर, कौशल्य विकास क्षेत्रात नागपूरच्या संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे अनिल रामदास जिभकाटे हेही राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

(केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. पुरस्कार विजेत्या शिक्षकांशी, नंतर राष्ट्रपतींनी अमृत उद्यानात संवाद साधला.)

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शिक्षक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. व्यक्तीमत्वांची जडणघडण करण्यासाठीचा शिक्षकांचा समर्पण भाव म्हणजे अधिक मजबूत आणि उज्ज्वल भविष्याचा पाया असल्याचं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातल्या तब्बल २९ जिल्ह्यांमधल्या १९१ तालुक्यांमध्ये मोठं नुकसान झालं आहे. राज्यभरात १४ लाख ४४ हजार ७४९ हेक्टर, म्हणजे ३६ लाख ११ हजार ८७२ एकर क्षेत्र बाधित झालं आहे. त्यापैकी १० हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र बाधित असलेले १२ जिल्हे आहेत. नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक ६ लाख २० हजार ५६६ हेक्टर क्षेत्रावरच्या पिकांचं नुकसान झालं आहे. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी ही माहिती दिली.

सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग या पिकांचं सर्वाधिक नुकसान झालं आहे. काही ठिकाणी भाजीपाला, फळबागा, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी आणि हळद या पिकांनाही फटका बसला आहे.

नुकसानीच्या पंचनाम्याचं काम अंतिम टप्प्यात असून शेतकऱ्यांना योग्य ती मदत तातडीनं दिली जाईल. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, असं भरणे म्हणाले.

**<><><><><>**

जीएसटी परिषदेनं कर सुसूत्रीकरणाला मंजुरी दिल्याबद्दल, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आनंद व्यक्त केला आहे. सामान्य नागरिक, शेतकरी, मध्यमवर्गीय, तसंच लहान उद्योजक आणि व्यापाऱ्यांना या निर्णयामुळे फायदा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. जीएसटी कर पुनर्रचनेत, अन्नपदार्थांवरच्या करात झालेल्या बदलांची थोडक्यात माहिती ऐकूया…

**होल्ड- व्हॉईस कास्ट - तुषार पवार**

जीएसटी करांच्या पुनर्चरनेमुळे कर आकारणीत सुटसुटीतपणा आला आहे तसंच अनेक गरजेच्या वस्तूंवरचा कर कमी झाल्यानं त्या स्वस्त होतील. दूध आणि दुधाच्या प्रक्रीयाकृत पदार्थांवरचा १२टक्के आता ५ टक्के झाला आहे. पॅकबंद पनीरवर पूर्वी १२ टक्के जीएसटी होता तो आता पूर्णपणे काढून टाकण्यात आला आहे. बाटलीबंद पाण्याच्या २० लीटरच्या कॅनवरचा कर १२ टक्क्यांवरुन ५ टक्के

झाला आहे. याखेरीज सुकामेवा, आईसक्रीम, साखरेपासून बनलेल्या मिठाया ऐन सणासुदीला स्वस्त होतील. पॅकबंद फरसाण आणि इतर तयार खाद्यपदार्थांवरचा करही कमी करुन ५ टक्क्यांवर आला आहे. पोळी, चपाती, पराठा, खाखरा अशा खास भारतीय ब्रेडसदृश पदार्थांवर आता शून्य कर असेल. साखरेत मुरवलेल्या भाज्या, फळं, मश्रूम्स, त्यांचे जॅम, जेली आणि प्युरी यांच्यावर ५ टक्के कर असेल. मात्र आरोग्याला प्रतिकूल असलेली शीतपेयं, फळांचे रस , साखर किंवा इतर मधुरकं वापरलेली पेयं यांच्यावरचा कर २८ टक्क्यांवरुन ४० टक्के करण्यात आला आहे. ऐकूया यावर एका गृहिणीची प्रातिनिधिक प्रतिक्रीया.....

**होल्ड- स्नेहल काशीद**

*(ऐन सणासुदीच्या तोंडावर मिठाई, फरसाण असे पदार्थ स्वस्त झाले तर पाहुण्यांचं तोंड गोड करता येईल. भाज्या, फळं, डाळींचे सांडगे तर सर्वांनाच लागतात. तसंच कोल्डड्रिंक महाग झाले तर कमी प्यायले जाईल. हा परिणाम चांगलाच म्हटला पाहिजे.*

**<><><><><>**

न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांनी आज मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून शपथ घेतली. मुंबईत राजभवनात झालेल्या या कार्यक्रमात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी न्यायमूर्ती चंद्रशेखर यांना पदाची शपथ दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह इतर मंत्री, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि अधिकारी यावेळी उपस्थित होते.

न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर, मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायाधीश म्हणून काम करत होते. यापूर्वी त्यांनी झारखंड उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायाधीश म्हणूनही काम पाहिलं आहे.

**<><><><><>**

गणेशोत्सवाच्या मंगल पर्वाची उद्या अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेश विसर्जनानं सांगता होणार आहे. गणेश विसर्जन सोहळ्यासाठी मुंबई पुण्यासह ठिकठिकाणच्या स्थानिक प्रशासनानं सुरक्षा, स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरणपूरक व्यवस्थेची काटेकोर आखणी केली आहे. ठिकठिकाणी विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली असून अनेक ठिकाणी मूर्तीदानाचा उपक्रम राबवण्यात येणार आहे. वाहतुकीचं नियमन करण्यात येत असून सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे.

विसर्जन मिरवणुकांच्या पार्श्वभूमीवर ईद ए मिलाद निमित्तची मिरवणूक येत्या सोमवारी काढण्याचा निर्णय मुस्लिम समाजानं घेतला आहे.

**<><><><><>**

ईद मिलाद उन नबी अर्थात प्रेषित महंमद यांचा जन्मदिवस आज साजरा होत आहे. हिजरी कालगणनेनुसार प्रेषित महंमदांची ही पंधराशेवी जयंती असल्यामुळे यावर्षी या सणाला आणखी महत्त्व आहे. ठिकठिकाणी मिलाद मैफिली आणि सीरत परिषदांचं आयोजन करण्यात आलं आहे, तसंच मिरवणुका काढण्यात येत आहेत.

नागपूरमधे भव्य मिरवणूक काढत ईद मिलादुन्नबीचा उत्सव साजरा करण्यात आला. राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह सर्वधर्माच्या समाज बांधवांनी हजेरी लावत मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. शहरात नेहमीप्रमाणे सामाजिक ऐक्याचं दर्शन घडवत सर्व समाजाच्या वतीनं जागोजागी मिरवणुकीत सहभागी बांधवांसाठी अल्पोपाहारासह, सरबत, पिण्याचे पाणी, फळ आदीचे स्टॉल लावले होते.

जश्न ईद ए मिलाद उन नबी निमित्त हिंगोलीत मोफत आरोग्य शिबिरात तज्ञ डॉक्टरमार्फत तपासणी करून मोफत औषध वाटप करण्यात आलं. ४६० गरजवंत रुग्णांनी या सेवेचा लाभ घेतला.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्यात संततधार पाऊस सुरू असून त्यामुळे पांझरा, बुराई, बोरी या नद्यांसह अनेक नाल्यांना पूर आले आहेत. पांझरा नदीवरच्या अक्कलपाडा धरणात पाण्याची पातळी वाढल्यामुळे आज दुपारी ११ हजार ८२५ क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आला. त्यामुळे पांझरा नदीला पूर आला आहे. बुराई नदीवरच्या बुराई मध्यम प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस झाल्यानं, येत्या काही तासात धरणाच्या सांडव्यावरून पाण्याचा विसर्ग सुरू केला जाणार आहे. त्यामुळे बुराई नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्तानं कौशल्य विभागाच्या वतीनं रोजगार आणि स्वयंरोजगार सेवा पंधरवडा साजरा केला जाणार असल्याची माहिती, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नवोन्मेष मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली. येत्या १७ सप्टेंबर पासून २ ऑक्टोबर पर्यंत हा पंधरवडा राबवला जाईल. याअंतर्गत राज्यातल्या सुमारे ७५ हजार तरुणांना कौशल्यविषयक प्रशिक्षण दिलं जाणार आहे.

१ ऑक्टोबरला राज्यभरातल्या ४१९ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये संबंधित अभ्यासक्रमांचा प्रारंभ केला जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर राज्य शासनाने हैदराबाद गॅझेट लागू करण्यासाठी शासन निर्णय जारी केला आहे. हा शासन निर्णय रद्द करण्याच्या मागणीसाठी हिंगोली जिल्ह्यात आज ओबीसी समाजानं, औरंगाबाद - नांदेड या महामार्गावर  रास्ता रोको आंदोलन केलं.

<><><><><>

मुंबईसह राज्यात आजपासून पावसाचा जोर पुन्हा वाढण्याची शक्यता, हवामान विभागानं व्यक्त केली आहे. आज सायंकाळपासून उद्या सायंकाळपर्यंत मुंबईत जोरदार पाऊस कोसळणार आहे.

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेला कमी दाबाचा पट्टा पश्चिमेकडे सरकत असल्यानं मुंबई, ठाणे आणि उपनगरांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कोकण किनारपट्टी आणि घाटमाथ्यावर पुढचे दोन दिवस पावसाचा जोर जास्त राहील. ठाणे, पालघर, नंदुरबार, नाशिक आणि पुणे घाट परिसरासाठी, हवामान विभागानं ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

मराठवाड्यात विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याची शक्यता असून विदर्भात केवळ हलक्या सरींचा अंदाज आहे.

या महिन्यात देशात सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता असून महाराष्ट्रातही पावसाचं प्रमाण वाढेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. विशेषतः कोकण, घाटमाथा आणि उत्तर महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा जोर कायम राहील.

//<><><><><>//